सार्वजनिक आरोग्य विभांतर्गत कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी (CSR) करीता समिती स्थापन करुन धोरण राबविणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०२३/प्र.क्र.२७१/आरोग्य-३अ,

१० वा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल इमारत,
मंत्रालय, मुंबई-४०० ००१.
दिनांक: १३ ऑगस्ट, २०२४.

वाचा :-

१) सहसंचालक (रुग्णालये) तथा सदस्य सचिव (सी.एस.आर) आरोग्य सेवा, महाराष्ट्र, मुंबई यांचे पत्र क्र.राआसो/CSR Cell/PHD CSR Policy/१२८८३०-८३५/२०२४, दि.०२.०२.२०२४.

प्रस्तावना:-

राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत जनतेच्या सर्वांगीन आरोग्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. सदर कार्यक्रम प्रभाविपणे राबविताना निधीची आवश्यकता भासते. तसेच विविध बहुराष्ट्रीय व नामांकीत कंपन्यांचे प्रतिनिधी वारंवार कंपनीकडे उपलब्ध असलेल्या CSR निधीचे नियोजन करण्याकरीता संपर्क साधत असतात. त्यानुषंगाने यशवंतराव चव्हाण केंद्र येथे दि.२४.०२.२०२४ रोजी महाराष्ट्र CSR कॉनक्लेव्ह २०२४ आयोजित करण्यात आली होती. त्यामध्ये विविध खाजगी कंपण्यांचे व्यवस्थापक तसेच त्यांच्या प्रतिनिधिंनी CSR निधीमधून आरोग्य विभागास सहाय्य करण्याची तयारी दर्शविली आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाची प्रमुख उद्धिष्टे साध्य करण्याकरीता खाजगी क्षेत्र अत्यंत महत्वाचा वाटा उचलेल. आरोग्य विभागाचे उद्धिष्ट्य साध्य करण्याकरीता कॉर्पोरेट संस्था पाठिंबा देण्यास इच्छुक असल्याचे विचारात घेऊन सार्वजनिक आरोग्य विभागाशी संबंधित कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी (CSR) क्रियाकलापांचे जलद, पारदर्शक आणि प्रभावी अंमलबजावणी आयुक्त, आरोग्य सेवा, मुंबई यांनी कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी (CSR) बाबतच्या धोरणाचा मसुदा तयार केला असुन सदर मसुद्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णय :-

सार्वजनिक आरोग्य विभागाशी संबंधित कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी (CSR) क्रियाकलापांचे जलद, पारदर्शक आणि प्रभावी अंमलबजावणी करण्याकरीता सोबत जोडण्यात आलेल्या परिशिष्ट -अ मध्ये नमूद केलेल्या धोरणास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२४०८१३१७१३०६७३१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ARVIND BHIMRAO MORE

Digitally signed by ARVIND BHIMRAO MORE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PUBLIC HEALTH DEPARTMENT, 2.5.4.20=203af2dfba7db2a4824298a34f2c9294f93396f53d7f87cd4d69fecf5cf7005f, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=9246B8CCD2E2CB10707678D45EA1AD26CC1E4D7BFF7BD2AA1F253A716B8C448B, cn=ARVIND BHIMRAO MORE
Date: 2024.08.13 18:10:26 +05'30'

(अ. भि. मोरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल, (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई /नागपूर.
२. आयुक्त,आरोग्य सेवा तथा अभियान संचालक,राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
३. आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
४. जिल्हाधिकारी (सर्व)
५. मुख्याधिकारी, जिल्हा परिषद/नगरपरिषद (सर्व)
६. संचालक-१, आरोग्य सेवा, आरोग्य सेवा आयुक्तालय, आरोग्य भवन, मुंबई.
७. संचालक-२, आरोग्य सेवा, पुणे.
८. अतिरिक्त संचालक (मानसिक आरोग्य), आरोग्य सेवा, मुंबई.
९. सहसंचालक (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा, मुंबई.
१०. सहसंचालक (रुग्णालये) तथा सदस्य सचिव (सी एस आर), आरोग्य सेवा, मुंबई.
११.उपसंचालक, आरोग्य सेवा मंडळ (सर्व)
१२.जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय (सर्व)

१३. जिल्हा आरोग्य अधिकारी (सर्व)

१४.जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)

१५. निवडनस्ती (आरोग्य-३अ)

परिशिष्ट -अ

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग

कॉर्पोरेट सामाजीक जबाबदारी

विभागाची प्रमुख उद्दिष्टे साध्य करण्यासाठी कॉर्पोरेट क्षेत्र अत्यंत महत्वाचा वाटा उचलेल अशी या विभागाची धारणा आहे. विभागाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी कॉर्पोरेट संस्था पाठिंबा देण्यास इच्छुक आहेत आणि हे विचारात घेऊन, सार्वजनिक आरोग्य विभागाशी संबंधित कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी (CSR) क्रियाकलापांचे जलद, पारदर्शक आणि प्रभावी अंमलबजावणी करण्याकरीता धोरणात्मक संरचना तयार करण्यात येत आहे.

कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी (CSR) मार्फत कॉर्पोरेट संस्थांचे प्रयत्न आणि वचनबद्धता स्थानिक समुदाय आणि समाजाच्या आर्थिक विकासाकरिता समर्पित करण्याचे योगदान असते.

व्यवसाय समुदाय या CSR उपक्रमांच्या अंमलबजावणीसाठी नाविन्यपूर्ण, वैज्ञानिक, कार्यक्षम आणि प्रभावी दृष्टिकोन प्रदान करणेबाबत योगदान देऊ शकतो. तसेच लक्ष्यित लोकसंख्येची (राज्याच्या जवळपास ९.३५%) सर्वसमावेशक, सुरक्षित आणि निरोगी वाढ करण्याच्या सरकारच्या प्रयत्नांमध्ये सक्रिय भागीदार बनू शकतो.

केंद्र सरकारच्या कंपनी कायदा, २०१३ च्या ७ व्या अनुसूची आणि कलम १३५ मधील , कलम १३५ (१) नुसार पात्र कॉर्पोरेट संस्था त्यांचा कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी करीता उपलब्ध निधीतून खालील प्रकल्प / उपक्रमांसाठी खर्च करू शकतात.

१. उपासमार, दारिद्र्य आणि कुपोषण निर्मूलन आणि स्वच्छतेसह प्रतिबंधात्मक आरोग्य सेवेला प्रोत्साहन देणे , स्वच्छतेच्या प्रचारासाठी केंद्र सरकारने स्थापन केलेल्या स्वच्छ भारत कोशामध्ये योगदान देणे आणि पिण्याचे शुद्ध पाणी उपलब्ध करणे;
२. विशेषतः मुले, स्त्रिया, वृद्ध, अपंग आणि उपजीविका वर्धन प्रकल्पांमध्ये व्यावसायिक कौशल्ये वाढविणारे विशेष शिक्षण आणि रोजगार यासह शिक्षणाचा प्रचार करणे;
३. स्त्री-पुरुष समानतेला प्रोत्साहन देणे, महिलांचे सक्षमीकरण करणे, महिला आणि अनाथ मुलांसाठी घरे आणि वसतिगृहे उभारणे; ज्येष्ठ नागरिकांसाठी वृद्धाश्रम, डे केअर सेंटर आणि अशा इतर सुविधांची स्थापना तसेच सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या गटांना भेडसावणारे अनेक प्रश्न व त्यामधील असमानता कमी करण्यासाठी उपाययोजना करणे.
४. पर्यावरणीय शाश्वतता, पर्यावरणीय समतोल, वनस्पती आणि जीवजंतूंचे संरक्षण, प्राणी कल्याण, कृषी वनीकरण, नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण तसेच माती, हवा आणि पाण्याची गुणवत्ता सुनिश्चित करणे [गंगा नदीच्या पुनरुज्जीवनासाठी केंद्र सरकारने स्थापन केलेल्या "स्वच्छ गंगा निधी" मध्ये योगदानाचा समावेश आहे]
५. ऐतिहासिक महत्त्व असलेल्या इमारती आणि स्थळांच्या जीर्णोद्धारासह राष्ट्रीय वारसा, कला आणि संस्कृतीचे संरक्षण सार्वजनिक ग्रंथालयांची स्थापना; पारंपारिक कला आणि हस्तकला यांचा प्रचार आणि विकास

६. सशस्त्र दलातील दिग्गज, विधवांसह त्यांचे आश्रित, केंद्रीय सशस्त्र पोलीस दल (CAPF) आणि केंद्रीय पॅरा मिलिटरी फोर्सेस (CPMF) दिग्गज आणि विधवांसह त्यांचे आश्रित यांच्या फायद्यासाठी उपाययोजना;
७. ग्रामीण खेळ, राष्ट्रीय स्तरावर मान्यताप्राप्त खेळ, पॅरालिम्पिक खेळ आणि ऑलिम्पिक खेळांना प्रोत्साहन देण्यासाठी प्रशिक्षण.
८. पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधी किंवा पंतप्रधान केंद्रीय सहाय्य आणि आपत्कालीन परिस्थितीत मदत निधी (पीएम केअर फंड) किंवा सामाजिक-आर्थिक विकास, अनुसूचित जाती व जमाती, इतर मागासवर्गीय, अल्पसंख्याक आणि महिलांच्या मदत व कल्याणासाठी केंद्र सरकारने स्थापन केलेल्या इतर कोणत्याही निधीमध्ये योगदान.
९. (अ) केंद्र सरकार किंवा राज्य सरकार किंवा सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम किंवा केंद्र सरकार किंवा राज्य सरकारच्या कोणत्याही एजन्सीद्वारे अनुदानित विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि औषध क्षेत्रातील इनक्यूबेटर किंवा संशोधन आणि विकास प्रकल्पांसाठी योगदान;

<u>आणि</u>

९. (ब) सार्वजनिक अनुदानित विद्यापीठांना योगदान; इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (IITs); अणुऊर्जा विभाग (DAE) अंतर्गत स्थापित राष्ट्रीय प्रयोगशाळा आणि स्वायत्त संस्था; जैवतंत्रज्ञान विभाग (DBT); विज्ञान आणि तंत्रज्ञान विभाग (DST); फार्मास्युटिकल्स विभाग; आयुर्वेद, योग आणि निसर्गोपचार मंत्रालय, युनानी, सिद्ध आणि होमिओपॅथी (AYUSH); इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालय आणि इतर संस्था, म्हणजे संरक्षण संशोधन आणि विकास संस्था (DRDO); भारतीय कृषी संशोधन परिषद (ICAR); भारतीय वैद्यकीय संशोधन परिषद (ICMR) आणि वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषद (CSIR), शाश्वत विकास ध्येय (SDGs) ला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि औषधांमध्ये संशोधन करण्याास योगदान आहे.
१०. ग्रामीण विकास प्रकल्प.
११. झोपडपट्टी क्षेत्र विकास.
१२. लैंगिक समानता, महिला आणि अनाथ मुलांसाठी घरे आणि वसतिगृहे बांधणे.
१३. सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या घटकांची असमानता कमी करण्यासाठी उपाययोजना.

CSR अंशदानाचे वरीलप्रकारचे उदिष्टये लक्षात घेता सार्वजनिक आरोग्य विभागाला दर्जेदार, न्याय्य आणि किफायतशीर सेवा प्रदान करण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी मार्फत मदत घेणे व्यवहार्य आहे.

<u>कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी (CSR) अंतर्गत कॉर्पोरेट संस्थांसाठी अपेक्षित लाभ:</u>

१. प्रशिक्षण केंद्रांवर कॉर्पोरेटचे ब्रँडिंगद्वारे प्रचार जेथे कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी निधी आणि ऐच्छिक देणग्यांद्वारे प्रशिक्षण दिले जात आहे.
२. कर सवलत.
३. अंमलात आणलेल्या कार्यक्रमाचे सरकारी संस्थांमार्फत निरीक्षण.
४. हाती घेतलेल्या प्रकल्पांसाठी पारदर्शक देखरेख आणि मूल्यमापन प्रणाली.
५. निवडलेल्या प्रकल्पासाठी प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर प्रभाव मूल्यांकन.

६. कॉर्पोरेट संस्थांमधील विशेषतज्ञांद्वारे ज्ञान सामायिकी करणाची संधी.
७. कर्मचारी प्रतिबद्धता.

२. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अंतर्गत कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी धोरणाची व्याप्ती आणि उद्दिष्टे-

१. कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व अंतर्गत उपक्रम हाती घेण्यासाठी धोरणात्मक आणि कायदेशीर फ्रेमवर्क विकसित करणे.
२. कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारीच्या माध्यमातून राज्यातील सार्वजनिक आरोग्याशी संबंधित विविध उपक्रमांची अंमलबजावणी करणे, आढावा घेणे व आवश्यकतेप्रमाणे संबंधीतांशी समन्वय साधणे.
३. राज्य सार्वजनिक आरोग्य विभागाच्या आवशक्यतेनूसार आणि कॉर्पोरेट भागीदारांच्या अपेक्षांनुसार कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारीचा वापर करण्यासाठी कॉर्पोरेट भागीदारांशी प्रभावी समन्वय राखणे.
४. कॉर्पोरेट भागीदारांच्या कौशल्याचा वापर करून आरोग्य सेवांचा दर्जा वाढवणे.
५. दुर्गम भागात असलेल्या आरोग्य सुविधांना सहकार्याचा लाभ मिळावा यासाठी राज्य पातळीवर समन्वय साधणे.
६. हाती घेतलेल्या CSR प्रकल्पांमध्ये रोजगाराच्या संधींना प्रोत्साहन देणे
७. विभागाला आवश्यक असेल त्याप्रमाणे कार्यशाळा, परिषदा, एक्सेंज प्रोग्रॅम इत्यादी कार्यक्रम आयोजित करणे.

३. अनुसूची VII (i) – "प्रतिबंधात्मक आरोग्य सेवेसह आरोग्य सेवेचा प्रचार करणे" अंतर्गत कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी मध्ये अनुज्ञेय बाबींचा खालीलप्रमाणे उल्लेख केला आहे-

१. "वैद्यकीय आणि कायदेशीर मदत, रस्ते अपघातातील पीडितांना उपचार" करणारे सामाजिक व्यवसाय प्रकल्प
२. अपंग व्यक्तींसाठी सहाय्य आणि उपकरणांसाठी तरतुदी
३. आपत्ती निवारण अंतर्गत उपक्रम
४. रस्ते अपघातांच्या बाबतीत महामार्गांभोवती ट्रॉमा केअर निगडीत बाबी.
५. प्रतिबंधात्मक आरोग्य सेवा बळकट करण्यासाठी व सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या गटांना भेडसावणा-या समस्या कमीत कमी करून उपाय योजनेचे समर्थन करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य प्रणालींमध्ये तसेच त्यांच्या वितरणात सुधारणा करणे.

सदर यादीमध्ये जन सामान्यांच्या आरोग्याशी निगडीत इतर बाबींचा समावेश करता येऊ शकतो.

राज्यात कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी अंतर्गत समित्यांची संरचना -

१) नियामक समिती -

अ.क्र	पदनाम	
१.	मा. मंत्री , आरोग्य व कुटुंब कल्याण, मुंबई,महाराष्ट्र	अध्यक्ष
२.	अतिरिक्त मुख्य सचिव/मा. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई	सह-अध्यक्ष
३.	सचिव - २, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई	सदस्य
४.	संचालक, आरोग्य सेवा, मुंबई	सदस्य
५.	संचालक २, आरोग्य सेवा, पुणे	सदस्य

६.	सहसचिव/उपसचिव (रूग्णालये), सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई	सदस्य
७.	सहसंचालक (रूग्णालये), आरोग्य सेवा, मुंबई	सदस्य सचिव

जबाबदारी –

१. CSR अंतर्गत रू. १०.००/- कोटी पेक्षा जास्त किंमत लागणाऱ्या प्रकल्पांना मान्यता देणे.

२. आरोग्य सेवेच्या विकासासाठी CSRनिधी व प्रकल्पांच्या संदर्भात सुकाणू समितीने प्रस्तावित केलेल्या धोरणात्मक बाबींबद्दल मार्गदर्शन करणे व मंजूर करणे.

३. आरोग्य सेवेच्या विकासासाठी CSR निधी व प्रकल्पांच्या संदर्भात समस्यांचे निरासन करणे.

४. CSR अंतर्गत राबविण्यात येणा-या प्रकल्प व उपक्रमाचा सुकाणू समितीने वेळोवेळी घेतलेल्या आढावांचे परीक्षण करणे व योग्य ते मार्गदर्शन करणे.

५. CSR अंतर्गत राबविण्यात येणा-या प्रकल्प व उपक्रमाचा सुकाणू समितीने वेळोवेळी घेतलेल्या प्रभाव मूल्यांकनाचे परिक्षण करणे . त्यामधून उपयुक्त प्रकल्पांबद्दल धोरणात्मक निर्णय घेणे.

६. सदर समितीची बैठक किमान ६ महिन्यातून एकदा घेण्यात यावी. याची जबाबदारी सदस्य सचिवांची असेल.

२) सुकाणू समिती -

अ.क्र	पदनाम	
१.	अतिरिक्त मुख्य सचिव/मा. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई	अध्यक्ष
२.	सचिव - २, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई	सह-अध्यक्ष
३.	आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, रा.आ.अ.,मुंबई	सदस्य
४.	संचालक, आरोग्य सेवा, मुंबई	सदस्य
५.	संचालक २, आरोग्य सेवा, पुणे	सदस्य
६.	सहसंचालक (रूग्णालये), आरोग्य सेवा, मुंबई	सदस्य सचिव
७.	सहसचिव/उपसचिव (रूग्णालये), सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई	सदस्य

जबाबदारी:

१. आरोग्यासंबंधित CSR उपक्रमांचे व्यवस्थापन आणि सुसूत्रता करण्यासाठी आराखडा तयार करणे

२. CSR अंतर्गत रू. १.००/- कोटी ते १०.००/- कोटी पर्यंत किंमत लागणाऱ्या प्रकल्पांना मान्यता देणे.

३. राज्यस्तरीय समन्वय समिती कडून प्राप्त झालेल्या अर्जांची आणि कार्यवाहीची छाननी करणे. यामध्ये CSR अंतर्गत रू. १०.००/- कोटी पर्यंत किंमत लागणाऱ्या प्रकल्पांना मान्यता देणे.

४. राज्यस्तरीय सीएसआर समन्वय समितीने तयार केलेल्या उद्देश आणि कार्यपद्धतीचे विधानाचे परिक्षण करणे व त्यास मान्यता देणे.

५. राज्यस्तरीय समन्वय समिती व संस्थेव्दारे तयार केलेल्या सर्व कालबद्ध योजनांना मंजुरी देणे व त्यांचे निरीक्षण करणे.

६. CSR उपक्रमांची अंमलबजावणी सुलभ करण्यासाठी संबंधित संचालनालय, जिल्हा/तालुका /म.न.पा/ क्षेत्रीय अधिकारी येथील आरोग्य अधिकारी आणि सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेतील इतर संबंधित सक्षमांशी समन्वय साधने.
७. CSR उपक्रमांच्या अंमलबजावणीसाठी बेसलाइन, मिडलाइन आणि एंड-लाइन मेट्रिक्स चे विश्लेषण करण्याकरिता योग्य अहवाल गोळा करणे आणि सदर माहितीचा साठा ठेवणे.
८. सीएसआर क्रियाकलापांच्या अंमलबजावणीचे परीक्षण आणि समर्थन करणे.
९. आरोग्याशी संबंधित उपक्रमांना पाठिंबा देण्यास स्वारस्य दर्शविलेल्या विविध कंपन्यांना "समर्थनासाठी विनंती" प्रस्ताव सादर करण्यास मार्गदर्शन करतील.
१०. प्रकल्प मूल्यांकनासाठी निकष ठरविणे (project assessment) तयार करण्यात राज्य CSR समन्वय कक्षाला मदत करणे आणि मुद्दा क्र. ३ नुसार त्यास मान्यता मिळवून देणे.
११. उपक्रम आणि प्रकल्पांच्या प्रगतीचे मुल्यांकन तयार केलेल्या indicators प्रमाणे वेळोवेळी आढावा घेणे.
१२. आवशक्यतेनुसार किंवा उपक्रमाच्या संपूष्टतेनंतर प्रभाव मूल्यांकन करणे.
१३. सदर समितीला प्रस्तुत केल्या प्रमाणे सीएसआर प्रकल्पाचे सादरीकरण संबंधित विभाग प्रमुख व सहभागी संस्थांद्वारे होणे बंधनकारक असेल.
१४. सीएसआर प्रकल्पांमधील खाजगी संस्थेने मागणी केल्यास किंवा कार्यशाळा आयोजित करण्यासाठी, वार्षिक समिट/कॉन्क्लेव्ह याकरीता अर्थसंकल्पीय योगदानाबाबत तसेच यासाठी केंद्र किंवा राज्य सरकारकडून आवश्यक किंमत प्रस्तावित करण्याबाबत निर्णय घेण्याची जबाबदरी सदर समितीची असेल.
१५. सदर समितीची बैठक तिमाही (तीन मन्यिातून एकदा)आयोजित करण्यात यावी. याची जबाबदारी ही सदस्य सचिवांची असेल.

३) आयुक्तालय स्तरावरील समन्वय समिती -

अ.क्र	पदनाम	
१.	आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, रा.आ.अ.,मुंबई	अध्यक्ष
२.	संचालक, आरोग्य सेवा, मुंबई / मा. संचालक २, आरोग्य सेवा, पुणे	सदस्य
३.	संचालक, वैद्यकिय शिक्षण व संशोधन किंवा त्यांचे प्रतिनिधी	सदस्य
४.	सहसंचालक (रूग्णालये),आरोग्य सेवा, मुंबई	सदस्य सचिव
५.	रा.आ.अ.,मुंबई चे संबंधित विषयांचे सहसंचालक/उपसंचालक	सदस्य
६.	अधिक्षक अभियंता, पायाभुत सुविधा कक्ष,रा.आ.अ.,मुंबई	सदस्य
७.	उपसंचालक (आयइसी), आरोग्य सेवा,पुणे	सदस्य
८.	राज्य कार्यक्रम व्यवस्थापक (रा.आ.अ./ रा.श.आ.अ.)मुंबई	सदस्य
९.	राज्य विधी सल्लागार, रा.आ.अ.,मुंबई,	सदस्य
१०.	सल्लगार -पब्लिक हेल्थ (पीपीपी), रा. आ. अ, महाराष्ट्र, मुंबई	सदस्य
११.	कार्यक्रम व्यवस्थापक, पीपीपी, रा. आ. अ, महाराष्ट्र, मुंबई	सदस्य
१२.	खाजगी/ एन.जी.ओ/ देणगीदार संस्था यांचे प्रतिनिधी	सदस्य
१३.	सल्लागार, Developmental Partner at State Level (कोणतेही दोन)	निमंत्रीत

जबाबदारी:

१. CSR अंतर्गत रू. १.०० कोटी पर्यंत किंमत लागणाऱ्या प्रकल्पांना मान्यता देणे. याव्यतिरीक्त रू. १.००/- कोटीपेक्षा जास्त किंमत लागणा-या प्रकल्पांना उपरोक्त समित्यांकडून मान्यता मिळवून देणे.
२. राज्यस्तरीय CSR समन्वय कक्षाव्दारे प्रस्तूत जिल्हानिहाय व कार्यक्रमनिहाय अहवालाचे पुनरावलोकन करणे.
३. विभागाच्या आवशाक्यतेनूसार आणि CSR अंतर्गत खाजगी संस्थांच्या ऐच्छिक बाबींमध्ये समतोल साधून प्रकल्प अंमलात आणणे.
४. प्रयत्नांची दुपट्टीकरण टाळण्यासाठी विभाग समिती आणि जिल्हास्तरीय समितीच्या माध्यमातून राज्यात सूरू असलेल्या प्रकल्पांची माहिती घेवून जास्तीत जास्त फायदे मिळवा याद्दष्टीने कॉर्पोरेट कंपन्यांचे प्रयत्न आणि हितसंबंध एकत्रित करण्याच्या संधींचा उपयोग करणे.
५. कार्यपध्दतीचे विधान व Key Performance Indicator तसेच सीएसआर चे फ्रेमवर्क तयार करण्याकरीता सुकाणू समितीला मदत करणे.
६. सीएसआर उपक्रमांच्या अंमलबजावणीचे वेळोवेळी परिक्षण करणे आणि राज्य सुकाणू समितीला नियमितपणे माहिती देणे.
७. आवश्यक कौशल्ये आणि क्षमतांचे (जसे की एनजीओ, कंत्राटदार, तांत्रिक तज्ञ, प्रशिक्षक, इ.) खाजगी संबंधित भागीदारांची यादी व माहितीचा साठा ठेवण्याकरीता राज्यस्तरीय सीएसआर समन्वय कक्षाला मदत करणे.
८. राज्यातील सीएसआर प्रकल्पांमधील सर्वोत्तम पद्धती संकलित आणि प्रकाशित करणे.
९. राज्यामध्ये तसेच इतर राज्यांमध्ये सीएसआर अंतर्गत आरोग्य सेवेशी संबंधित सर्वोत्तम पद्धतींवर राज्यस्तरीय सीएसआर समन्वयक कक्षाद्वारे संशोधन करून राज्यात धोरणे अध्ययतन करणे.
१०.सीएसआर कंपन्या आणि विभाग यांच्यातील सोयीस्कर समन्वय स्थापित करण्यासाठी नाविन्यपूर्ण उपाययोजना करणे उदा. सॉफ्टवेअर, वेबसाइट इत्यादींचा विकास करणे.
११.प्रकल्पाच्या अंमलबजावणीत येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी शासन, इतर विभाग आणि संचालनालय यांच्याशी समन्वय साधणे.
१२.आवश्यक मान्यतेनंतर, इच्छुक कॉर्पोरेट कंपनीसह सामंजस्य करार करण्याकरीता राज्यस्तरीय सीएसआर समन्वयक कक्षास मार्गदर्शन करणे.
१३.सदर समितीत CSR करीता मदत करण्यासाठी इच्छूक असलेले कोणतेही दोन राज्यस्तरावर कार्यरत कोणतेही दोन Developmental Partners समावेश असावा.
१४.सदर समितीची बैठक दोन महिन्यातून एकदा आयोजित करण्यात यावी. याची जबाबदारी सदस्य सचिवांची असेल.

४) आयुक्तालय स्तरावरील सीएसआर समन्वय कक्ष -

अ.क्र.	पदनाम	
१.	सहसंचालक (रूग्णालये), आरोग्य सेवा,मुंबई	विभाग प्रमूख
२.	सल्लगार -पब्लिक हेल्थ (पीपीपी), रा. आ. अ, महाराष्ट्र, मुंबई	सदस्य
३.	कार्यक्रम व्यवस्थापक, पीपीपी, रा. आ. अ, महाराष्ट्र, मुंबई	सदस्य
४.	सल्लागार, Developmental Partner at State Level (कोणतेही दोन)	सदस्य
५.	कार्यक्रम सहायक, पीपीपी, रा. आ. अ, महाराष्ट्र, मुंबई	सदस्य

जबाबदारी -

१. आयुक्तालय स्तरावरील समन्वय समिती मधील वरील सदस्य आयुक्तालय स्तरावरील सीएसआर समन्वय कक्ष मध्ये समन्वयक म्हणून काम करतील.
२. सदर कक्ष राज्यातील कोणत्याही सीएसआर प्रस्तावासाठी संपर्काची पहिली पायरी असेल.
३. राज्यस्तरीय सीएसआर समन्वयक समितीला तिची भूमिका आणि जबाबदाऱ्या पार पाडण्यात मदत करेल.
४. विभाग स्तर आणि जिल्हा स्तरावरील CSR अंतर्गत आवश्यकतेनूसार प्रस्तावित केलेल्या प्रकल्पांचे मूल्यांकन करून तसेच संबंधीत विभाग प्रमूखांकडून सीएसआर अंतर्गत जिल्हानिहाय व कार्यक्रमनिहाय प्रकल्पाची माहिती घेऊन एकत्रित करणे व सहभागासाठी CSR करीता इच्छुक कंपन्यांशी संपर्क साधणे व पुढील मान्यतेस सादर करणे.
५. राज्यात सुरू असलेल्या सर्व सीएसआर प्रकल्पाची माहिती विभागीय व जिल्हा समितीव्दारे प्राप्त करून अद्यावत यादी तयार ठेवणे.
६. इच्छुक कॉर्पोरेट कंपनीसह सामंजस्य कराराचे प्रारूप राज्यस्तरीय समन्वय समितीच्या मदतीने तयार करणे.
७. राज्यामध्ये तसेच इतर राज्यांमध्ये सीएसआर अंतर्गत आरोग्य सेवेशी संबंधित सर्वोत्तम पद्धतींवर संशोधन करून राज्यस्तरीय सीएसआर समन्वयक समितीला राज्यात धोरणे अध्ययतन करण्यात मदत करणे. याकरीता National Healthcare Innovative Portal ची मदत घेणे.
८. राज्यांतर्गत आणि बाहेरील यशस्वी CSR उपक्रमांच्या बाबत माहिती पुरविणे.
९. सीएसआर अंतर्गत सर्व ईच्छूक खाजगी संस्थांची यादी (प्रतिनिधीचे नाव, मोबाईल क्रमांक, पत्ते) ठेवणे तसेच त्यांच्यासोबत समन्वय साधणे.
१०. कार्यपध्दतीचे विधान, Key Performance Indicators व Project Proposal तयार करण्याकरीता व अद्यावत करण्याकरीता राज्यस्तरीय सीएसआर समन्वयक समिती व संबंधीत खाजगी संस्थेस मदत करणे.
११. सदर कक्ष वार्षिक समिट/कॉन्क्लेव्ह/कार्यशाळा आयोजित करण्यासाठी समन्वय साधण्याची जबाबदारी सदर कक्षाची असेल.
१२. सार्वजनिक आरोग्य विभागामध्ये जास्तीत जास्त CSR प्रकल्प आकर्षित करण्याकरीता व त्यासंबंधी जनजागृती करण्याकरीता Website, माहिती पुस्तिका इत्यादी बाबींवर कार्यवाही करणे.

५) विभागीय स्तरावरील सी.एस.आर. समिती -

अ.क्र	पदनाम	
१.	उपसंचालक, आरोग्य सेवा, प्रभारी परिमंडळ	अध्यक्ष
२.	सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा	सदस्य सचिव
३.	सहाय्यक संचालक (मलेरीया)	सदस्य
४.	परिमंडळ कार्यक्रम व्यवस्थापक, परिमंडळ	सदस्य
५.	पीपीपी समन्वयक, उपसंचालक, परिमंडळ	सदस्य
६.	खाजगी/ एन.जी.ओ/ देणगीदार संस्था यांचे प्रतिनिधी	सदस्य
७.	इतर	निमंत्रित

जबाबदारी –

१. CSR अंतर्गत रू. ११ लक्ष ते २० लक्ष पर्यंत किंमत लागणाऱ्या प्रकल्पांना मान्यता देणे. याव्यतिरीक्त रू. २०.०० लक्ष पेक्षा जास्त किंमत लागणा-या प्रकल्पांना आयुक्तालय स्तरावरील समन्वय समिती मान्यता मिळवून देणे
२. आवश्यक सहाय्यासाठी जिल्ह्यांमध्ये/नगर पालिकांमध्ये गरजेचे मूल्यांकन करणे.
३. सामुदायिक/स्थानिक स्तरावर सीएसआर स्वारस्य आणि प्रकल्पाच्या आवश्यक्यतेची जुळणी सुलभ करणे .
४. प्रकल्पाच्या आवश्यक्यता किंवा प्रकल्पातील सहाय्य प्रस्तावित करण्यासाठी राज्यस्तरीय सीएसआर समन्वय कक्षाशी समन्वय साधणे.
५. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या संबंधित जिल्हा, ब्लॉक आणि नगर पालिका आरोग्य अधिकाऱ्यांनी आवश्यक्यतेनुसार प्रस्तावित केलेल्या हस्तक्षेपांचे नियोजन आणि अंमलबजावणी करणे.
६. सदर समितीची बैठक प्रमुख कामगिरी निर्देशकांच्या आधारे विभागीय स्तरावरील प्रकल्पांचे निरीक्षण करणे करिता महिन्यातून एकदा आयोजित करण्यात यावी, याची जबाबदारी ही सदस्य सचिवांची असेल.
७. राज्य स्तरावरून राबविण्यात येणाऱ्या सर्व सीएसआर उपक्रमांचे निरीक्षण करणे.
८. जिल्ह्यांतील सर्व प्रस्ताव एकत्र करणे आणि राज्यस्तरीय सीएसआर समन्वय कक्षाकडे सादर करणे.

६) जिल्हा स्तरावरील सी.एस.आर. समिती –

अ.क्र	पदनाम	
१.	जिल्हाधिकारी	अध्यक्ष
२.	मुख्य कार्यकारी अधिकारी	सह अध्यक्ष
३.	जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद	सदस्य सचिव
४.	जिल्हा शल्यचिकित्सक	सह सदस्य सचिव
५.	सहाय्यक संचालक (क्षयरोग,टि.बी)	सदस्य
६.	नामनिर्देशित सदस्य /NGO,CSR, संस्था	सदस्य
७.	वैद्यकिय आरोग्य अधिकारी, महानगरपालिका	सदस्य
८.	जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक,जिल्हा परिषद	सदस्य
९.	शहरी कार्यक्रम व्यवस्थापक, मनपा (शहरी भागतील प्रस्ताव असल्यास)	सदस्य
१०.	खाजगी/ एन.जी.ओ/ देणगीदार संस्था यांचे प्रतिनिधी	सदस्य
११.	इतर	निमंत्रित

जबाबदारी –

१. CSR अंतर्गत रू. १० लक्ष पर्यंत किंमत लागणाऱ्या प्रकल्पांना मान्यता देणे. याव्यतिरीक्त रू. १०.०० लक्ष पेक्षा जास्त किंमत लागणा-या प्रकल्पांना विभागीय स्तरावरील सी.एस.आर. समिती मान्यता मिळवून देणे
२. आवश्यक सहाय्यासाठी जिल्ह्यांमध्ये/नगर पालिकांमध्ये गरजेचे मूल्यांकन करणे.
३. सामुदायिक/स्थानिक स्तरावर सीएसआर स्वारस्य आणि प्रकल्पाच्या आवश्यक्यतेची जुळणी सुलभ करणे.
४. प्रकल्पाच्या गरजा किंवा प्रकल्पातील सहाय्य देण्यासाठी राज्यस्तरीय सीएसआर समन्वय कक्षाशी व विभागीय स्तरावरील सी.एस.आर. समितीसोबत समन्वय साधणे.

५. सध्या जिल्ह्यांमध्ये सुरू असलेल्या सीएसआर प्रकल्पांबद्दल विभाग आणि राज्य सीएसआर समन्वय कक्षाला सूचित करणे आणि संसाधने आणि प्रयत्नांची दुप्पटीकरण टाळण्यासाठी प्रस्तावांची चाळणी करणे.

६. सदर समितीची बैठक ही महिन्यातून एकदा आयोजित करण्यात यावी, याची जबाबदारी ही सदस्य सचिवांची असेल.

७. राज्य स्तरावरून राबविण्यात येणाऱ्या सर्व सीएसआर उपक्रमांचे निरीक्षण करणे.

८. सीएसआर क्रियाकलापांच्या अंमलबजावणी आणि पूर्णतेचे परीक्षण आणि समर्थन करणे.

- **तथापि कोणत्याही CSR उपक्रमादरम्यान खालील गोष्टी विचारात घेतल्या पाहिजेत.**

१. CSR उपक्रम राबविणाऱ्या कंपनीला कोणतीही जमीन किंवा इतर कोणत्याही मालमत्तेचा मालकी हक्क दिला जाणार नाही.


२. विभागांतर्गत आयोजित CSR उपक्रम (In kind) स्वरूपातील असतील. कोणत्याही स्तरावर रोख रक्कम स्वीकारली जाणार नाही.

३. CSR अंतर्गत कार्यक्रम राबविताना निर्माण होणारे कोणत्याही प्रकारच्या दायित्वांसाठी विभाग जबाबदार असणार नाही.

४. गरजेनुसार, एक प्रकल्प व्यवस्थापन संघ निर्माण करता येऊ शकेल जेणेकरून प्रकल्प व्यवस्थापन समर्थन प्रदान करणे आणि प्रकल्पांचे प्रभावी निरीक्षण करणे शक्य होईल.

५. देणगीदाराच्या बांधलेल्या इमारतीला त्यांच्याशी संबंधीत नाव दिले जाणार नाही.

CSR Proposal Flow Chart



ANNEXURE-A
Govt. of Maharashtra
Department of Public Health
Corporate Social Responsibility

The department firmly believes that the contribution of the Corporate Sector shall play a crucial role in achieving the key objectives of the department. The corporate bodies are willing to support the department in achieving its goals and taking this into consideration, the department is planning to come up with a basic policy framework for quick, transparent and effective implementation of the Corporate Social Responsibility activities pertaining to Public Health Department, Government of Maharashtra.

Corporate Social Responsibility (CSR) comprises of the efforts and commitment made by businesses to contribute to economic and social development of the local community and society at large.

Business community can come up with innovative, scientific, efficient, effective approaches in implementing CSR initiatives and become an active partner in Government's efforts of providing an all-inclusive, safe, secure and healthy growth of its target population (almost 9.35% of the state population)

As per the 7th Schedule and Section 135 of the Companies Act, 2013, Central Government has accorded permission to corporates eligible under Section 135 (1) to spend their Corporate Social Responsibility funds for the following projects / activities:

1. Eradicating hunger, poverty and malnutrition, promoting health care including preventive health care and sanitation including contribution to the Swach Bharat Kosh set-up by the Central Government for the promotion of sanitation and making available safe drinking water;

2. Promoting education, including special education and employment enhancing vocation skills especially among children, women, elderly, and the differently abled and livelihood enhancement projects;

3. Promoting gender equality, empowering women, building homes and hostels for women and orphans; Establishment of old age homes, day care centres and other such facilities for senior citizens as well as taking measures to reduce the many problems and inequalities faced by the socially and economically backward groups.

4. Ensuring environmental sustainability, ecological balance, protection of flora and fauna, animal welfare, agroforestry, conservation of natural resources and maintaining quality of soil, air and water 48[including contribution to the Clean Ganga Fund setup by the Central Government for rejuvenation of river Ganga;

5. Protection of National Heritage, art and culture including restoration of buildings and sites of historical importance and works of art; setting up public libraries; promotion and development of traditional arts and handicrafts;

6. Measures for the benefit of armed force veterans, war widows and their dependents, Central Armed Police Forces (CAPF) and Central Para Military Forces (CPMF) veterans, and their dependents including widows;

7. Training to promote rural sports, nationally recognized sports, Paralympic sports and Olympics sports.

8. Contribution to the Prime Minister's National Relief Fund or Prime Minister's Central Assistance and Relief in Emergency Situations Fund (PM CARES Fund) or any other fund set up by the Central Government for socio-economic development and relief and welfare of the Scheduled Castes, the Schedule Tribes, other backward classes, minorities and women;

9(a) Contribution to incubators or research and development projects in the field of science, technology, engineering and medicine, funded by the Central Government or State Government or Public Sector Undertaking or any agency of the Central Government or State Government;

And

9(b) Contributions to public funded Universities; Indian Institute of Technology (IITs); National Laboratories and autonomous bodies established under Department of Atomic Energy (DAE); Department of Biotechnology (DBT); Department of Science and Technology (DST); Department of Pharmaceuticals; Ministry of Ayurveda, Yoga and Naturopathy, Unani, Siddha and Homoeopathy (AYUSH); Ministry of Electronics and Information Technology and other bodies, namely Defence Research and Development Organisation (DRDO); Indian Council of Agricultural Research (ICAR); Indian Council of Medical Research (ICMR) and Council of Scientific and Industrial Research (CSIR), engaged in conducting research in science, technology, engineering and medicine aimed at promoting Sustainable Development Goals (SDGs).Rural Development projects.

10. Rural Development Projects.

11. Slum Area Development.

12. Gender equality, building homes and hostels for women and orphans

13. Measures to reduce inequality of socially and economically backward elements.

Considering the above objectives of CSR contribution, it is feasible to seek assistance through corporate social responsibility to achieve the objective of providing quality, equitable and cost-effective services to the public health department.

- **Expected Benefits for Corporate Institutions under Corporate Social Responsibility (CSR):**

1. Publicity through corporate branding at training centres where training is being provided through corporate social responsibility
2. Tax Exemptions
3. Monitoring of program implementation through government agencies
4. Transparent monitoring & evaluation system for undertaken projects
5. Impact Assessment after completion of project for selected project
6. Opportunity for Knowledge Sharing by Domain Experts in Corporate Organizations
7. Employee engagement

- **Scope and Objectives of Corporate Social Responsibility Policy under the Department of Public Health**

1. To develop a strategic and legal framework for undertaking projects under corporate social responsibility.
2. To implement, coordinate and monitor various activities related to Public Health in the state through corporate social responsibility.
3. To maintain effective coordination with corporate partners for utilization of corporate social responsibility as per the requirements of State Public Health Department and expectations of the corporate partners.
4. To enhance the quality of health services by utilizing the expertise of corporate partners.
5. To coordinate at the state level to ensure that the health facilities located in remote areas benefit from collaboration.
6. To encourage employment opportunities in the undertaken CSR projects
7. To organize workshops, conferences, exchange programs etc. as may be required by the department.

- **Permissible activities included under Schedule VII (i) under 'promoting health care including preventive health care' through corporate social responsibility fund and voluntary donations:**

1. Social Business Projects envisaging "provision of medical and Legal aid, treatment to road accident victims"

2. Provisions for aids and appliances to the differently- able persons
3. Activities under Disaster relief
4. Trauma care around highways in case of road accidents.
5. Enabling access to, or improving the delivery of, public health systems for strengthening preventive healthcare and supporting in measures for reducing inequalities faced by socially & economically backward groups.

   The list can be non-exhaustive.

Composition of the CSR Committees in the State

1. Governing Committee

Sr. No.	Designation	
1.	Hon. Minister, Health & Family Welfare, Mumbai, Maharashtra	Chairman
2.	Additional Chief Secretary/Principal Secretary, Department of Public Health, Mantralaya, Mumbai	Co- Chairman
3.	Secretary II	Member
4.	Director 1 DHS Mumbai	Member
5.	Director 2 DHS Pune	Member
6.	Joint Secretary / Deputy Secretary, PHD, Mantralaya, Mumbai	Member
7.	Joint Director (Hospital), DHS, Mumbai	Member Secretary

Roles and responsibilities:

1. To approve the activities/projects/programs of INR more than 10 crores, out of the funds received through corporate social responsibility
2. To guide and approve regarding policy matters as proposed by the steering committee for the benefit of public health in Maharashtra
3. To facilitate solving the issues for the CSR activities by coordinating with various departments as required
4. To monitor the reviews of the CSR activities/projects/programs as taken by the Steering committee and provide guidance and suggestions as required
5. To take policy level decisions regarding the projects with good impact found as in the impact assessment by the Steering committee for the benefit of Public Health in the state
6. It shall be a responsibility of the member secretary to convene and hold the committee meetings at least once in 6 months

2. Steering Committee –

Sr. No.	Designation	
1.	Additional Chief Secretary/Principal Secretary, Department of Public Health, Mantralaya, Mumbai	Chairman
2.	Secretary - 2, Department of Public Health, Mantralaya, Mumbai	Co-chairman
3.	Commissioner Health Services and Mission Director, NHM	Member
4.	Director of Health Services, -1 Mumbai	Member
5.	Director of Health Services - 2 Pune	Member
6.	Joint Director (Hospital), DHS, Mumbai	Member Secretary
7.	Joint Secretary / Deputy Secretary, PHD, Mantralaya, Mumbai	Member

Roles and responsibilities:

1. To create a framework for management and facilitation of Health related CSR activities.
2. To approve of activities/projects/programs of INR 1 crore to INR 10 crore, out of the funds received through corporate social responsibility
3. This committee will scrutinise the applications and course of action received from the State CSR Coordinating Cell. It will approve the projects up to INR 10 crores and forward the projects above INR 10 crores to the Governing committee for the approval.
4. To approve and monitor all the time bound plans created by the organization in coordination with the State CSR coordinating committee
5. To facilitate execution of the CSR activities by connecting to the relevant directorates, District/Block/Corporation Health Officer and other relevant enablers in the Public Health System.
6. Coordinating with concerned Directorates, Health Officers at District/ Taluka/ Mahanagar Palika/ Zonal Officers and other relevant authorities in the public health system to facilitate implementation of CSR activities.
7. To gather and maintain appropriate reports highlighting the baseline, midline and end-line metrics for due execution of the CSR activities.
8. To monitor and support the execution of CSR activities.
9. To release "request for support" proposal to various companies who have expressed interest in supporting Health related initiatives.
10. Support the State CSR Coordination Committee in reviewing the key performance indicators for project assessment to give administrative approval for them as per the point no 3.

11. Periodically review the progress of activities and projects as per the Key Performance Indicators

12. Conduct impact assessment of the projects as and when required or on completion

13. In these, it will be mandatory for the concerned Head of the Department and the corporate stakeholder to submit a report on the corporate social responsibility Project.

14. The said committee shall be responsible for deciding on the budgetary contribution for the Annual Summit/Conclave as well as proposing the required cost from the Central or State Governments for the same, if requested by private organizations in CSR projects or for conducting workshops.

15. The meeting of the said committee should be held quarterly (once in three months). Member Secretary will be responsible for this.

3. Coordination Committee at Commissionerate level

Sr. No.	Designation	
1.	Commissioner Health Services and Mission Director, NHM, Maharashtra, Mumbai.	Chairman
2.	Director of Health Services, Mumbai/ Pune	Member
3.	Director, Medical Education and Research or their representative	Member
4.	Joint Director (Hospital), DHS, Mumbai	Member Secretary
5.	Joint Director/Deputy Director concerned to the subjects	Member
6.	Superintending Engineer, Infrastructure Cell, NHM Mumbai	Member
7.	Deputy Director (IEC), Health Services, Pune	Member
8.	State Program Manager, NUHM/NHM, Mumbai	Member
9.	State Legal Adviser, NHM Mumbai	Member
10.	Consultant - Public Health (PPP) , NHM Mumbai	Member
11.	Program Manager, PPP, NHM Mumbai	Member
12.	Representative of Private/ NGO/ Donor Institutions	Member
13.	Consultant, Developmental Partner at State Level (any two)	Invitee

Roles and Responsibilities

1. To approve activities/projects/programs of up to INR 1 crore. Any proposals above INR 1 cr, must be approved through Steering or Governing Committee, as applicable.

2. To review the report the requirements submitted by the State Level CSR Coordinating Unit based on the program wise & district-wise need assessments conducted by the HODs

3. To facilitate matching of the CSR interest and the requirements of the department.

4. The committee shall keep a track on the on-going projects in the State and on the field through the division and district level committee in order to avoid duplication of projects/efforts and

utilize the opportunities to integrate the efforts and interest of the corporate companies to yield maximum benefits

5. Assist the state steering committee in drafting SOPs and key performance indicators in order to make the framework for CSR activities for project assessment.
6. Monitoring implementation of CSR activities and provide information to State Steering Committee on regular basis.
7. To support the State CSR coordinating cell in identifying relevant implementation/execution partners with relevant skills and capabilities required (such as NGOs, contractors, Technical experts, trainers, etc.)
8. Compile and publish Best Practices among the implemented CSR within the state
9. To implement and update the policy in the state by conducting research on best practices related to Health Care from corporate social responsibility through State CSR Coordinating Cell
10. It will be the responsibility of the committee to innovate regarding the platforms for convenient access and approach between CSR companies and the department. For ex. Development of a software, website etc.
11. To coordinate with the Government, other departments and the Directorate to resolve the difficulties encountered in the implementation of the project.
12. The committee will support the State CSR Coordinating Cell in the signing of MoU's/ agreements with the interested corporate company after the necessary approvals.
13. In this Cell, Consultants of any 2 Developmental Partners at State Level who can contribute to the department for bringing in CSR initiatives are included.
14. It shall be a responsibility of the member secretary to convene and hold the committee meetings once in two months

4. State Level CSR Coordinating Unit

Sr. No.	**Designation**	
1.	Joint Director (Hospital), DHS Mumbai	Head of the Department
2.	Consultant, Public Health (PPP), NHM, Maharashtra, Mumbai	Member
3.	Program Manager, PPP, NHM, Maharashtra, Mumbai	Member
4.	Consultant, Developmental Partner of State level (Any 2)	Member
5.	Program Assistant, PPP, NHM, Maharashtra, Mumbai	Member

Roles and responsibilities:

1. The above members of the Commissionerate Level Coordination Committee will act as coordinators in the Commissionerate Level CSR Coordination Cell.

2. This unit will be the first point of contact for any CSR proposal in the State.
3. It will assist the State level CSR committee in fulfilling its roles and responsibilities.
4. Evaluate need based assessments provided by division level & district level CSR committees & collate the requirements also compile the project proposals as received from the HoDs. In order to approach the CSR companies for participation.
5. By evaluating the projects proposed under CSR at department level and district level as per the requirements and collecting information about district wise and program wise projects under CSR from the concerned department heads and contacting companies interested in CSR for participation and submitting for further approval.
6. Prepare draft MoUs/Agreements with support of State CSR Coordinating Committee
7. Keep an updated list of all interested and eligible CSR donors/stakeholders along with the details of the representatives and their contact details in order to establish further coordination.
8. Conduct research on best practices related to Health Care from corporate social responsibility. Can refer to the National Healthcare Innovation Portal.
9. To share best practices of successful CSR initiatives from within and outside of the state
10. Assist the state CSR coordinating committee and the CSR stakeholder in drafting project proposals, SOPs and key performance indicators.
11. It will be the responsibility of the State Level CSR Coordinating Cell to coordinate for arranging the annual summit/conclave/workshops.
12. To attract maximum CSR projects in Public Health Department and take action on Website, information booklet etc. to create public awareness about it.
13. It shall be a responsibility of the member secretary to convene and hold the committee meetings once in a month or as and when necessary.

5. Division Level CSR Committee

Sr. No.	**Designation**	
1.	Deputy Director, Health Services	Chairman
2.	ADHS, Health Services	Member secretary
3.	ADHS (Malaria)	Member
4.	Circle Program Managers, NHM Maharashtra	Member
5.	PPP Coordinators, NHM Maharashtra	Member
6.	Representatives of Corporate/NGO/Donor organization	Member
7.	Others	Invitee

Roles and responsibilities:

1. To approve CSR projects costing between Rs.11 lakhs to Rs.20 lakhs. Projects with cost more than Rs.20 lakhs shall require approval from Commissionerate level coordination committee.
2. Conducting need assessments in the districts/corporations for support required for implementation of projects
3. To facilitate matching of CSR interest and need at the community/local level
4. To Coordinate with the State level CSR coordinating cell for conveying the needs of the project or support in the project
5. To enable planning and implementation of interventions based on needs identified by relevant district, block and corporation health officers of the Public Health Department
6. Monitoring all the CSR activities implemented from the state level.
7. It shall be a responsibility of the member secretary to convene and hold the committee meetings once in a month to review the projects on divisional level based on key performing indicators
8. Collate all the proposals from the districts and submit to the State level CSR coordinating cell

6. District Level CSR Committee

Sr. No.	Designation	
1.	District Collector	Chairman
2.	Chief Executive officer	Co-chairman
3.	District Health officer	Member Secretary
4.	Civil Surgeon	Co-member Secretary
5.	ADHS (Malaria, Leprosy) / DTO (TB)	Member
6.	Nominated member/s of NGOs, CSR organization	Member
7.	Medical Health Officer, Municipal Corporation	Member
8.	District Programme Manager, NHM, Maharashtra	Member
9.	City Program Manager (to be invited when proposal is from urban area), NHM, Maharashtra	Member
10.	Representatives of Corporate/NGO/Donor organization	Member
11.	Other	Invitee

Roles and responsibilities:

1. To approve CSR projects costing up to Rs.10 lakhs. Projects with cost more than Rs.10 lakhs shall require approval from Division Level CSR committee
2. Conducting need assessments in the blocks for support required.
3. To facilitate matching of CSR interest and need at the community/local level

4. To Coordinate with the Division Level CSR Committee and State Level CSR Coordinating unit for conveying the needs of the project or support in the project
5. Notifying the Division and state CSR cell coordinating cell about the CSR projects currently being run in the districts and rationalize the proposals to avoid duplication of resources and efforts.
6. It shall be a responsibility of the member secretary to convene and hold the committee meetings once in a month.
7. Monitoring all the CSR activities implemented from the state level.
8. To monitor and support the execution and completion of CSR activities.

- **However during any of the CSR activities following should be taken into consideration.**

1. No land or any other ownership rights shall be given to the company undertaking CSR activities. The CSR activities conducted within the department will be In kind format. No cash intakes will be received at any level.
2. Department would not be responsible for any kind of liabilities of the company undertaking activities.
3. As per the need, there shall be a Project Management Team which would provide project management support & monitor the Projects.
4. Name in favour of CSR companies will not be given to construct Building of donor.